





एक आशेचा किरण...

# स्नेहवन

या सुखांनो साद घालु
दु:खितांच्या जिवनी...

फुल नाही तर पाकळी होवू ।
दु:खितांच्या जिवनी सुगंध देवू ।।



WWW.SNEHWAN.IN

Donations to our Trust are eligible for benefits U/S 80G of Income tax Act.1961. Cheques should be made out in the name of Snehwan.

**FCRA : 083930758**

## Bank Details

**Bank Name: State Bank of India**
**Account Name: Snehwan**
**Branch: Pimpari Town**
**AC No. 35517151681**
**IFSC Code: SBIN0005923**

8796400484@okbizaxis

# स्नेहवन प्रवास...

अशोक देशमाने या तरुणाने 26 व्या वर्षी आयटीतील गलगठ्ठ पगाराची नोकरी सोडून महाराष्ट्रातील आत्महत्याग्रस्त शेतकरी, ऊसतोड कामगार, शेतमजूर यांच्या मुलांच्या शिक्षण व संगोपनासाठी स्नेहवन हा सामाजिक प्रकल्प 2015 ला पुणे येथे चालू केला. 6 वर्षांपूर्वी 18 मुलांपासून सुरु झालेलं हे रोपट आज 180 मुलांना आपल्या मायेच्या सावलीत वाढतात आहे.

सुरुवातीला 9 महिने नाईट शिफ्ट केली, परंतू मुलांना जास्त वेळ देणे शक्य होत नव्हते त्यामुळे अशोकने लग्नाअगोदरच नोकरी सोडून दिली आणी या खडतर मार्गावर चालणे सुरु केले.

**2016 मध्ये अशोकचे लग्न अर्चनाशी झाले.**
'आयुष्यभर कोणतीही तक्रार करणार नाही, या अटीवर अर्चनाने अशोकचा मानवधर्म स्वीकारला. तेंव्हा अर्चनाचे वय 20 वर्ष होते. संपुर्ण स्वयंपाकाची जबाबदारी अर्चना एकटी घेते, त्याच बरोबर मुलांचा अभ्यास घेणे, आजारपण ही ती आई होऊन आनंदाने निभावते. कामाच्या व्यापात तीचे पहिले अबॉर्शन ही झाले तरीही कामाप्रती तिचा ध्यास कमी नाही झाला. मुलांना जेवना सोबत प्रेम, आपुलकी, जिव्हाळा ही लागतो त्यामुळे आपण आयुष्यभर मुलांच्या सोबत एकत्र कुटूंब म्हणून रहायचे हे त्यांनी लग्नाअगोदरच ठरवले होते.

आज 31 वर्षीय अशोक आणि 24 वर्षीय अर्चना यांची स्वामी विवेकानंद, बाबा आमटे यांच्या प्रेरणेने स्नेहवनची ही खडतर वाटचाल सुरु आहे. स्नेहवन मध्ये सर्वांचे एकच कॉमन किचन असते, सर्वजण एक परिवार म्हणून जेवतात, एकत्र राहतात. सोबतीला अशोकचे आई वडीलही या कार्यात त्यांना मदत करत आहेत.



**डॉ. स्मितताई आणी डॉ. रवींद्र कुलकर्णी सर या दाम्पत्यांनी अर्चना आणी अशोकचा हा ध्येयवेडा प्रवास जवळून पाहिला आणी त्यांनी आपली 2 एकर जागा स्नेहवनला दान केली.**

हे ठिकाण शहराच्या खुप बाहेर आहे. आजूबाजूला कोणताही शेजार नाही, त्यामुळे लोकांना हे काम माहिती होत नाही आणी येणारी मदतही कमी होते.

स्नेहवनच्या माध्यमातून स्व. नलिनीताई कुलकर्णी ज्ञानग्राम चालु आहे. येथे स्वामी विवेकानंद ज्ञानालय, कामधेनू गौशाला, मोफत ग्रंथालय, संगणक प्रशिक्षण केंद्र चालु आहे. कामाचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढले आहे. अनेक अडचणीतून मार्ग काढत, संकटांचा सामना करत हा ज्ञानयज्ञ चालु आहे.


नुसते शालेय शिक्षण देणे किंवा मुलांचा सांभाळ करणे हा आमचा उद्देश नाही, मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना त्याग, सेवा, समर्पणाचे, सामाजिक बांधिलकीचे संस्कार देत सक्षम तरुण भारत उभारण्यात योगदान देण्याचा स्नेहवनचा संकल्प आहे.

### स्नेहवनच्या माध्यमातून सध्या खालील प्रकल्प चालु आहेत.

**स्नेहवन - ज्ञानालय**
हा स्नेहवनचा मुख्य प्रकल्प आहे. येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी, शेतमजूर, ऊसतोड कामगार यांच्या 50 मुलांचा सांभाळ केला जातो. त्यांच्या शिक्षण, संगोपन व आरोग्याची संपुर्ण जबाबदारी स्नेहवनमध्ये घेतली जाते. मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देवून, त्यांना एक आदर्श तरुण बनविण्यासाठी स्नेहवन काम करते. मुलांना शाळेव्यतीरिक्त, त्यांच्यातील सुप्तगुणांना वाव मिळावा यासाठी त्यांना योगा, संगीत, कुकिंग, शेती, डेअरी फार्मिंग, ऑरगॅनिक फार्मिंग असे अनेक प्रकारचे शिक्षण दिले जाते. तसेच, अकाउंटिंग, Administration, Softskill Development, Management skill development, Leadership development वर ही काम केले जाते. मुलांना निसर्ग संगोपन करत वृक्ष लागवड करण्यात आली आहे. व्यावहारिक शिक्षण, जीवनमूल्य शिकवण्यावर स्नेहवनचा भर असतो.
मुलांना गुणवत्तापूर्व शिक्षण, सुविधा देत मोठं करायचं ध्येय अर्चनाने व अशोकने उरी बाळगलं आहे, त्यांचा हा प्रवास समाजाच्या साथीनं सुरु आहे. 'पुढचे संपूर्ण आयुष्य याच कार्यासाठी द्यायचे ', हे या ध्येयवेड्या दाम्पंत्याने ठरवले आहे.



**ज्ञानछत्र -** आळंदी जवळील ठाकरवाडी या आदिवासी पाड्यावरील मुलींच्या शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी आणी एक वेळच्या जेवणाची जबाबदारी घेतली जाते.



**वंचितग्राम -** भीक मागणाऱ्या, भंगार जमा करणाऱ्या मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात सामील करून, त्यांची संपुर्ण शैक्षणिक जबाबदारी आणी एक वेळच्या जेवणाची जबाबदारी घेतली जाते.



**साखर शाळा -** आजुबाजूला ऊसतोड करायला आलेल्या कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी व त्यांना मुख्य प्रवाहात टिकून ठेवण्यासाठी काम केले जाते.



**संगणक प्रशिक्षण केंद्र-** स्नेहवनमध्ये सुसज्ज कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर उभारले आहे. ज्यात 150 मुलामुलींना मोफत संगणक प्रशिक्षण दिले जाते. कॉम्प्युटर रिपेअरींग, हार्डवेअर, मायक्रोसॉफ्ट वर्ड, एक्सेल फाईल, फोटोशॉप ही शिकवले जाते. इथे नवीन पार्ट घेण्यासाठी, रिपेअर करण्यासाठी, शिकवण्यासाठी volunteers व इतर मदत लागते.



**वाचनालय -** वाचन संस्कृती टिकून रहावी यासाठी दहा हजार पुस्तकांचे सुसज्ज ग्रंथालय, जे सर्वांसाठी मोफत उपलब्ध आहे.



**कौशल्य विकास केंद्र -** मुलांनी शिक्षण घेवून उद्योजक बनावे, इतरांसाठी रोजगार निर्माण करावेत असे आम्हाला वाटते. बालपणापासून मुलांच्या मनावर उद्योगाचे धडे बिंबवण्यासाठी त्यांना शेतीशी निगडित उद्योगांचे प्रशिक्षण दिले जाते जसे तेल बनवणे, दाळ बनवणे, पापड बनवणे.



## Eco Friendly Living

### A- Solar Power Station

स्नेहवन ही संस्था संपूर्ण सोलार एनर्जी वर चालते. संस्थेसाठी लागणारी संपुर्ण वीज सौरऊर्जेतुन तयार केली आहे. मुलांना नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्याचे शिक्षण आणी संस्कारक्षम दिले जातात.

### B- Biogas Generation plant

स्वयंपाकासाठी लागणारा संपूर्ण गॅस स्नेहवन मधील मुलेच बनवतात. दिवसाला 3 हजार लिटर गॅस तयार होतो. याच्या मेंटेनन्स साठी आर्थिक मदतीची गरज लागते.

**मोफत फिरता दवाखाना -** वंचित घटकातील बांधवांसाठी मोफत चेकअप तसेच मेडीकल. हेल्थ कॅम्प ही घेतले जातात. मेडिकलसाठी मदत लागते. आपण डॉक्टर असाल तर वेळ ही देवू शकता.

**कामधेनू गोशाळा -** देशी गीर गाईंचे संगोपन आणी गोसेवा. सध्या 6 गाई वासरे प्रकल्पात आहेत. आम्हाला इथे गाईच्या चाऱ्यासाठी मदत लागते.



कोणत्याही सरकारी अनुदानाविना, खडतर परिस्थितीतून हा ज्ञानयज्ञ चालू आहे. बालगोपालांचे जीवनमान उंचावणे आणि त्यांना समाजामध्ये विश्वासाने उभे राहण्यासाठी, आपले सहकार्य स्नेहवनसाठी अनमोल आहे.

**खालील प्रकारे आपण स्नेहवनला मदत करू शकता**

1- आपण CSR अंतर्गत सहकार्य करू शकता.
2- मुलांसाठी जेवणाची, नाश्त्याची पंगत देवू शकता.
3- प्रियजनांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधकामासाठी मदत करू शकता.
4- मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून सहकार्य करू शकता.
5- शिकवण्यासाठी किंवा इतर कामात आपला वेळ देवून शकता.
6- दैनंदिन लागणाऱ्या वस्तु किंवा त्याचा खर्च देवू शकता.

## प्रेरणादायी भेटी :



पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे आणि मंदाताई आमटे




पद्मश्री डॉ. तात्याराव लहाणे



आय. ए. एस. शेखर गायकवाड सर



आय. ए. एस. किरण गित्ते सर

पत्ता - स्नेहवन, कोयाळी फॉरेस्ट, कोयाळी तर्फे चाकण,
ता. खेड, जि. पुणे - 410501
(आळंदी पासून 8km अंतरावर - वडगाव घेनंद रोडवर.)

अशोक देशमाने - 87964 00484 (whats app) | 82372 77615
E-mail : snehwan@yahoo.in

www.facebook.com/snehwan www.instagram.com/ashok.snehwan https://wa.me/+91-8796400484